नि.फौ.प्र.क्र.४३७३/२०१६
सरकार वि. अंजली
निशाणी क्रमांक – २१

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक –०१**

**मी शपथेवर खरे सांगतो की,**

**माझे नाव :** सखाराम सटवाजी मोले
वय – ४५ वर्षे, व्यवसाय – पोलीस उपअधिक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, नागपूर.
राह. श्रीकृष्णनगर, नंदनवन, नागपूर.

**सरतपासणी सरकारतर्फे सहायक सरकारी वकील कु. आर.वी. चरडे यांचेमार्फत शपथेवर सुरू.**

१) दिनांक १८.०३.२०१६ रोजी मी लकडगंज पोलीस स्टेशन येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक या पदावर नेमणूकीस होतो. त्यादिवशी नेमणूकीस असतांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी सकाळी १०.०० ते रात्री ९.०० पर्यंत गंगाजमूना परिसरात प्रतिबधांत्मक कार्यवाहीकरीता आदेश दिले होते. त्यादिवशी माझ्यासोबत महिला होमगार्ड सरिता पराडकर, पोलीस कॉन्स्टेबल नितीन निशाणे हे दोघे होते. गंगाजमूना परिसरात पेट्रोलींग करीत असतांना दुपारी ४.३० वाजेच्या सुमारास भास्कर गल्लीकडे जाणा–या रस्त्याच्या कडेला एक महिला मोकळया जागेत स्वत:च्या अंगाचे अंगप्रदर्शन करून, हातवारे करून रस्त्यावरून येणा–या जाणा–या लोकांना वेश्या व्यवसायाकरीता प्रोत्साहीत करीत होती. माझ्यासोबत असलेल्या महिला कर्मचा–यांच्या मदतीने त्या महिलेला पकडण्याचा प्रयत्न केला परंतु ती पळु लागली. परंतु ती पाय घसरून खाली पडली. त्यामुळे तिच्या हनवटीला मार लागला व त्यातून रक्त आले. महिला कर्मचा–यांच्या मदतीने तिला ताब्यात घेतले. रस्त्यावरून जाणा–या दोन व्यक्तींना पंच म्हणून बोलावले. त्या पंचाना घटनेबाबत माहिती दिली. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.

माने यांना फोनद्वारे सदर घटनेची माहिती दिली. ते लगेच घटनास्थळी आले. पंच व श्री. माने यांच्यासमक्ष त्या महिलेला तिचे नांव विचारले असता तिने तिचे नांव अंजली कालखोर असे सांगीतले.

२) त्या महिलेला ती वेश्या व्यवसाय कुठे करते याबाबत विचारले असता तिने शिला कालखोर या महिलेच्या घरात एका खोलीत ती तो व्यवसाय करते असे सांगीतले. तिने असेही सांगीतले की त्या व्यवसायातून आलेल्या रकमेपैकी काही भाग ती शिला कालखोर हिला देते. आरोपी अंजली हिने दाखवल्याप्रमाणे घटनास्थळी जावून तेथे घटनास्थळ पंचनामा तयार केला. घटनास्थळावर एक लोखंडी पलंग, गादी, चादर, एक कंडोमचे पॅकेट, एक बकेट व मग ईत्यादी साहित्य होते. त्या खोलीच्या समोर एक मिटर होते. त्या मिटरचा नंबर २९५७९८३ असा होता. घटनास्थळाच्या १०० मिटरवर कमलीशाह दरगाह आहे. तसेच १३० मिटरवर दुर्गामाता मंदीर आहे व २० मिटर अंतरावर शारदा देवीचे मंदीर आहे. आता मला दाखविण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा हा तोच आहे. त्यावर माझी तसेच दोन पंचाच्या सहया आहेत व आरोपी अंजली हिचा अंगठा आहे. मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२२** देण्यात येते.

३) त्यानंतर आरोपी अंजली हिच्या हनुवटीला लागले असल्याने महिला पोलीस कर्मचा-याच्या मदतीने मेयो हॉस्पीटल येथे उपचाराकरीता पाठविले. त्यानंतर आरोपी अंजली हिला पोलीस स्टेशनला घेवून गेलो व मी स्वत: तिच्याविरूध्द सविस्तर फिर्याद दाखल केली. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद ही तीच आहे. त्यावर माझी सही आहे. मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२३** देण्यात

येते. पि.एस.आय. नेहारे यांनी मी दिलेल्या रिपोर्टवरून आरोपीविरूध्द गुन्हा नोंदवून घेतला. आता मला दाखविण्यात आलेल्या छापील प्रथम खबर अहवालावर माझी तसेच पि.एस.आय. नेहारे यांची सही आहे. मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२४** देण्यात येते. सदर गुन्हयाची पुढील कार्यवाही पी.एस.आय. नेहारे यांनी केली. आरोपी क्र.१ अंजली हिला मी ओळखतो. ती आज कोर्टात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलट तपास आरोपी तर्फे ॲड. श्री. एन.एन. राउत</u>**

४) हे म्हणणे खरे आहे की गंगाजमुना परिसरात एक पोलीस चौकी आहे. हे म्हणणे खरे आहे की त्या पोलीस चौकीत नेहमी अंदाजे पाच ते सहा पोलीस कर्मचारी हजर असतात. हे म्हणणे खरे आहे की जर कोणाला एखादी तक्रार द्यायची असल्यास ते त्या पोलीस चौकीला तक्रार देवु शकतात. हे म्हणणे खरे आहे की त्या परिसरातील एकाही व्यक्तीने आरोपी क्र.१ विरूध्द ती त्या परिसरात रस्त्याच्या कडेला उभे राहून हातवारे करून व अंगविक्षेपन करून रस्त्यावरून जाणा–या येणा–या लोकांना प्रलोभित करते याबाबतची कोणतीही तक्रार दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की सदर प्रकरणातील पंचाना पंच म्हणून हजर राहण्यास लेखी कळवले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळाच्या आजुबाजूच्या लोकांचे जबाब मी नोंदवले नव्हते. साक्षीदार सांगतात की ते पळून गेले होते.

५) हे म्हणणे खरे नाही की घटनास्थळ पंचनामा हा पोलीस स्टेशनला तयार केला. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी फिर्याद दाखल केली व खोटा घटनास्थळ पंचनामा तयार केला.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत समक्ष

(ए.पी. गिरडकर)
नागपूर. १५ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
दि. १८/०१/२०२३. तथा अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are word to word same as per original evidence.

Name of Stenographer : I.G. Sonkusare (Grade-II)